## २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनीनों,

आपणास कळविण्यात येते की, दि सर्वोदय को-ऑपरेटिव्ह बँकेची २६ वी वार्षिक सर्व साधारण सभा गुरुवार दि. २९ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ९.०० वा. सह्याद्री विद्यामंदिर सभागृह, तळमजला, शिवाजी महाराज तलावाजवळ, भांडुप (प.), मुंबई - ४०० ०७८ या ठिकाणी बँकेचे सन्माननीय **अध्यक्ष श्री. सतीश यशवंत थोरात** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे.

## विषय पत्रिका

१. दि. ३० मार्च २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला बँकेच्या कामकाजाचा अहवाल तसेच वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाची नोंद घेणे व तो स्वीकृत करणे.
३. सन २०२१-२२ सालच्या मंजूर अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास तसेच सन २०२२-२३ सालाकरिता तयार करण्यात आलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे
४. सन २०२१-२२ सालच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या लेखापरीक्षण अहवालाची व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे व तो स्वीकृत करणे.
५. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता बँकेच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार वैधानिक लेखापरीक्षकाचे नेमणुकीस मान्यता देणे.
६. सन २०२२-२३ सालाकरिता संचालक मंडळाने अंतर्गत लेखापरीक्षकांच्या केलेल्या नियुक्तीची व त्यांच्या मेहेनतान्याची नोंद घेणे.
७. २६ व्या वार्षिक सर्व साधारण सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेणे.

दिनांक : १५/०९/२०२२
स्थळ : भांडुप (प.), मुंबई

संचालक मंडळाच्या अनुज्ञेने,
श्री. मंगेश रावजी गुरव
सरव्यवस्थापक

टिप :

१. गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास, सदर सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर उपविधी ३५(३) अन्वये घेण्यात येईल व अशा सभेला गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२. वार्षिक सभेपुढे काही प्रश्न विचारावयाचे असल्यास वा सूचना मांडावयाच्या असल्यास त्या सभेपूर्वी किमान ७ दिवस आधी बँकेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत आणून द्याव्यात. आयत्यावेळी आलेल्या सूचनांचा विचार करणे बंधनकारक असणार नाही.
३. ज्या सभासदांनी त्यांच्या वारसात वा पत्यात बदल केला असेल त्यांनी तसे बँकेला कळवावे.
४. रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार सर्व खात्यांची केवायसी, पॅन व आधार निगडीत माहितीची पूर्तता करणे अनिवार्य असून सभासद तथा ग्राहकांना विनंती आहे की, त्यांनी सदर माहितीची पूर्तता केली नसल्यास तात्काळ पूर्ण करावी.
५. सभासदांनी आपल्या वार्षिक अहवालाची प्रत नजीकच्या शाखेतून घेऊन जावी. वार्षिक अहवाल बँकेच्या संकेतस्थळ www.sarvodayabank.in वर उपलब्ध आहे.